# जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन,
# अकोला यांचे कार्यालय

## निविदा सूचना

### द्रवनत्र / गोठीतविर्यमात्रा / द्रवनत्र भांडी वाहतूक निविदा

सर्व मिनीट्रकवाहतुक धारकांना सूचित करण्यात येते की, सन 2025-26 मध्ये (1 जुलै 2025 ते 30 जून 2026) जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन, अकोला मार्फत अकोला जिल्हयातीलपशुवैद्यकीय दवाखान्यामध्ये द्रवनत्र पात्रांची वाहतूक करण्याकरिता निविदा मागविण्यात येत आहेत. निविदा बाबतच्या नियम व अटी अर्जाचा नमुना या कार्यलयामध्येरुपये 1000/- (अक्षरी रुपये एक हजार फक्त) भरुन दिनांक 24/06/2025 पर्यत कार्यालयीन वेळेत उपलब्ध होऊ शकेल.

निविदा दिनांक 27/06/2025 रोजी सायंकाळी 5.00 वाजेपर्यंतजिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, अकोला यांचे कार्यालयात स्वीकारण्यात येतील व दिनांक 28/06/2025 रोजी दुपारी 3.00 वाजता निविदा समिती समोर उघडण्यात येतील. निविदामध्ये वाहतूक दर प्रतीकि.मी. असावा निविदा मंजूर अथवा नामंजूर करण्याचे सर्व अधिकारी निविदा समितीने राखून ठेवले आहेत. निविदा समितीचे निर्णय अंतिम राहतील.

(डॉ.अभिजित परांडेकर)
जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन,
अकोला

Scanned by CamScanner

## जिल्हा उपआयुक्त पशूसंवर्धन, अकोला

## निविदा सूचना

मालाची वाहतूक करणा-या ठेकेदारांना सूचना देण्यात येते की, जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, अकोला येथून खात्याने निश्चीत केलेल्या (राज्यातील व राज्या बाहेरील) ठिकाणी रिकामी द्रवनत्रपात्रे घेऊन जाणे व भरलेली द्रवनत्रपात्रे घेऊन येणे व त्याचा पुरवठा अकोला जिल्हयातील कृत्रिम रेतन उपकेंद्रांना दिनांक 1 जूलै 2025 ते 30 जुन 2026 कालावधी करीता द्रवनत्र व वियेमात्रा पुरवठा करावयाचा आहे. निविदेचे अंदाजीत मुल्य रु. 6,00,000/- एवढे आहे. त्या करीता मोहरबंद निविदा मागवायच्या आहेत. निविदांमध्ये दर प्रति कि.मी. असावा वाहनाचे दरमहा होणारे अंदाजीत कि.मी. 1200 व वार्षिक कि.मी. 15000 एवढे आहे.

### द्रवनत्र वायुच्या वाहतूकीचे नियम व अटी

1) द्रवनत्र वाहतूकीचे फार्म व अटी पत्रक रुपये 1000/- भरुन जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन, अकोला जिल्हा अकोला यांचे कार्यालयातून कार्यालयीन वेळेत मंगळवार दिनांक 24 जून 2025 पर्यंत उपलब्ध होऊ शकतील.

2) निविदा मोहरबंद असणे आवश्यक असुन त्या करीता दोन पाकिटाचा अवलंब करावा लागेल. दोन पाकिट पध्दतीमधील पहिल्या लिफाफयावर तांत्रिक निविदेचा लिफाफा असे लिहावे म्हणजेच त्यामध्ये नियम व अटी मान्य करुन स्वाक्षरी, प्रस्तावीत निविदा मुल्याच्या 1% टक्का इतक्या अनामत रकमेचा कॉल डिपॉझीट, इनकम टॅक्स क्लिअरन्स सर्टीफीकेट, वाहनाचे रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र, टॅक्स पावती, विमा प्रमाणपत्रे, फिटनेस प्रमाणपत्र, वाहतूक परवाना, ईत्यादी कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती राहतील. दुस-या लिफाफयावर व्यापारी लिफाफा किंवा दरासंबधी लिफाफा असे नमुद करुन त्यामध्ये फक्त वाहतूकीचे दरपत्रक राहील. वरिल दोन्ही लिफाफा मोहरबंद करुन निविदा शुक्रवार दिनांक 27 जुन 2025 रोजी सायंकाळी 5.00 वाजे पर्यंत जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, अकोला यांचे कार्यालयात स्विकारण्यात येतील. त्यानंतर निविदा स्विकारण्यात येणार नाहीत. पहिला तांत्रिक लिफाफा उघडल्यानंतर त्याची छाननी करुन सर्व कागदपत्रे असल्यास नियम व अटीची पुर्तता केल्यावरच दुसरा लिफाफा उघडण्यात येईल, अन्यथा नाही व निविदा रद्द करण्यात येइल. प्रत्येक वाहना करीता कागदपत्रे स्वतंत्र असावीत.

3) प्राप्त झालेल्या मोहरबंद निविदा शनिवार दिनांक 28 जुन 2025 रोजी दुपारी 3.00 वाजता निविदा समितीचे समोर उघडण्यात येतील. त्यावेळी निविदाधारक किंवा त्यांचा प्रतिनिधी उपस्थीत राहू शकेल.

4.) ज्या वाहतूक करणा-या ठेकेदारा जवळ किमान 2.5 टन क्षमता असलेले वाहन (मिनी ट्रक किमान 51 लिटर क्षमतेचे 24 ते 30 कंटेनर बसतील अशी व्यवस्था असावी) असेल अशा ठेकेदारांनीच वाहतूक निविदा भरावी.

5.) द्रवनत्र वायुपात्राची रिकामी किंवा भरलेली पात्रांची वाहतूक हि अकोला जिल्हा अंतर्गत, महाराष्ट्रात कोठूनही व परप्रांतातून जवळच्या मार्गाने करावी लागेल. या वाहतूकीचे दर निविदाधारकाने प्रति कि.मी. (जाणे- येणे धरुन) द्यावे लागतील व त्याचा वेगळा आकार दिला जाणार नाही. वाहतूकीचे दर राज्यातील व राज्या बाहेरील किंवा दोन्ही प्रकारच्या वाहतूकी करीता एकत्र देता येइल.

6.) वाहतूक ठेकेदार ज्या गाडीने वाहतूक करणार आहे ते वाहन त्यांच्या मालकीचे असावे. तो शक्यतोवर अकोला मुख्यालयाचाच असावा व त्याचा पत्ता वरील मुख्यालयाच्या ठिकाणी असावा.

7.) वाहतुकीचे वाहनामध्ये कॉयर मॅटींग/ नरम अच्छादनाचा वापर करणे आवश्यक आहे. त्यामुळे द्रवनत्रपात्रांचे नुकसान व तुटफूट होणार नाही तसेच वाहन हूड असलेले असावे म्हणजे ऊन,वारा व पाऊस या पासून

Scanned by CamScanner

मालास संरक्षण मिळेल. वाहनास ही व्यवस्था नसल्यास प्रत्येक खेपेस निविदाधारकास रुपये 300/- दंड आकारण्यात येईल व ही रक्कम त्याचे देयकामधून वसुल करण्यात येईल.

8.) द्रवनत्रपात्राची वाहतूक करताना त्या गाडीमध्ये जिल्हा कार्यालयाचे दोन प्रतिनीधी वाहनासोबत किंवा आवश्यकता भासल्यास खात्याचे अतिरीक्त प्रतिनिधी वाहनासोबत जाऊ शकतील.

9.) निविदाधारकास वाहनासोबत एक क्लिनर (चालक सोडून) द्रवनत्रपात्राची चढउतारासाठी ठेवावा लागेल. तसेच द्रवनत्रपात्रांची केंद्रापासून वाहनापर्यंत वाहतूक निविदाधारकाचे व्यक्ती कडून करुन घ्यावी लागेल. ही आवश्यक अट असून त्यासाठी कोणताही वेगळा आकार देण्यात येणार नाही.

10.)प्रत्येक वाहतुकीच्या वेळी द्रवनत्रपात्रे वाहन चालकाचे ताब्यात देण्यात येतील म्हणून त्यांची व्यवस्थीत सांभाळण्याची जबाबदारी वाहनाचे मालकावर निश्चीत राहील. वाहतुकीचे वेळी मालक किंवा त्याचे व्यक्तीचे ही पात्रे हाताळताना निष्काळजीपणा झाल्यास, द्रवनत्रपात्राची तुटफुट / नुकसान झाल्यास त्याची किंमत ठेकेदाराकडून वसूल करण्यात येईल.

11.)पशुधन विकास अधिकारी, जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, अकोला यांनी ठरवून दिलेल्या कार्यक्रमानुसार त्यांचे मागणीप्रमाणे सर्व दृष्टीने सुस्थीतीत असलेले वाहन उपलब्ध करुन न दिल्यास संबंधित वाहतूकी करीता जर बाहेरील बाजारातून दुसरे वाहन कोणत्याही उपलब्ध दराने मिळवण्यात आले तर त्या करीता लागणारे जास्तीचे भाडे वाहतूकदाराच्या देयकातून वसूल करण्यात येईल.

12.)द्रवनत्र वाहतूकीच्या सरस्थेवर आधारीत या कार्यालयाकरीता नेमलेले वाहनच उपलब्ध करुन द्यावे लागेल. व काही कारणाने लहान आकाराचे वाहन आवश्यक असतांना ठेकेदाराने मोठे वाहन उपलब्ध करुन दिले तर लहान आकाराचे वाहनाचाच भाव मिळेल.

13.)वाहन उपलब्ध करुन देण्याबाबत ठेकेदारास सर्वसाधारण 24 तासापूर्वी सूचना देण्यात येईल. ऐन वेळी काही अपरीहार्य कारण उदभवल्यास द्रवनत्र वाहतूकीचे कार्यक्रमामध्ये बदल किंवा कार्यक्रम रदद करण्याचे अधिकार पशुधन विकास अधिकारी, जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, अकोला यांना राहतील. पूर्वसुचना देऊनही वाहन उपलब्ध न झाल्यास किंवा वाहन उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ करीत आहात असे आढळून आल्यास वाहन धारकास प्रत्येक वेळेस कमितकमी रुपये 300/- व जास्तीत जास्त रुपये 1500/- दंड आकरण्यात येईल व ती त्याच्या देयकातून वसूल करण्यात येईल.

14.)वाहतूक करीत असतांना गाडीत अचानक बिघाड झाल्यास त्यांची दुरुस्ती ठेकेदारास स्वताचे खर्चाने करावी लागेल. योग्य दुरुस्ती अशक्य वाटल्यास दुसरे वाहन भाड्याने घ्यावे लागले तर त्याचे संपुर्ण भाडे ठेकेदारास द्यावे लागेल.

15.) वाहतूक करीत असतांना संबधीत वाहनात ठेकेदाराच्या व अधिकृत प्रतिनीधीशीवाय कोणीही इतर प्रवाशी / सामान घेऊ नये. असे आढळून आल्यास कमितकमी 100 व जास्तीत जास्त रुपये 1000 दंड आकारण्यात येईल.

16.) वाहतूक करीत असताना ठेकेदार व अथवा प्रतिनीधीकडून कोणत्याही प्रकारच्या वाहन परिवहन नियमविषयक किंवा पोलीसकायदा विषयक नियमाचे उल्लंघन झाल्यास त्यांची संपुर्ण जबाबदारी ठेकेदारावर राहील. व वाहन जप्त व इतर कार्यवाहीसाठी खोळंबून ठेवल्यास द्रवनत्रपात्राच्या वाहतूकीसाठी इतर वाहन उपलब्ध करुन देऊन त्यामध्ये द्रवनत्रपात्राची वाहतूक जबाबदारीने करुन घ्यावी लागेल. वाहनासोबत वाहनाची कागदपत्रे ठेवणे ठेकेदारास बंधनकारक राहील.

17.) ऐनवेळी एकापेक्षा जास्त वाहन या कार्यालयाकरीता लागल्यास इतर सुस्थीतीत परिवहन नियमयोग्य वाहने उपलब्ध करुन घ्यावी लागतील. ही वाहने अशावेळी मुख्य ठेकेदाराव्यतीरीक्त असु शकतील. मात्र वाहतुकीची जबाबदारी मुख्य ठेकेदाराचीच राहील.

18.)वाहतुक करतांना वाहनाचे कि.मी. रिडींग सुरु असणे आवश्यक आहे. त्यानुसार देयकाची रक्कम आकारण्यात येईल. वाहतूक देयक महिण्यातून एकदाच स्विकारण्यात येइल.

Scanned by CamScanner

19.) संबंधीत वाहनास इंधन / ऑइल/ ग्रीस इत्यादी वाहतूक ठेकेदारास स्वखर्चाने करावी लागेल व काही कारणाने इंधनाचे भाव वाढल्यास संबधीत कार्यालय भाववाढ देणार नाही.

20.) द्रवनत्र वाहतूकीचा ठेका हा दिनांक 1 जुलै 2025 ते 30 जुन 2026 या कालावधीचा राहील व पुढील निविदा ठेका मंजूर होई पर्यंत या ठेक्याचेच दराने द्रवनत्र वाहतुकीचे कार्य करावे लागेल. द्रवनत्र वाहतूक ठेक्याचे कालावधीत जर वाहतूकीची पर्यायी व्यवस्था केली तर वाहतूक करार केव्हाही रद्द केला जाईल.

21.) वाहतूक करीत असतांना शासकीय कामास्तव केंद्रावर किंवा कार्यालयात थांबण्याचे कालावधी करीता कोणताही आकार देण्यात येणार नाही. शासकीय प्रतिनीधीला कामाचे स्वरुपानुसार संबंधीत कार्यालयात, केंद्रात थांबता येईल व तोपर्यंत वाहन तेथे उभे ठेवावे लागेल.

22.) द्रवनत्र वायु हा एका पात्रातून दुस-या पात्रात टाकतांना सावधानतेने टाकावा तो निष्काळजीपणाने वाया गेल्याचे आढळल्यास त्याची भरपाई ठेकेदारास करुन द्यावी लागेल. द्रवनत्र वायु अतिथंड अवस्थेत असतो. त्यामुळे वातावरणाशी येताना जी वाफ निघते ती थंड असते. हा वायु स्फोटक नाही.

23.) यशस्वी ठेकेदारास निविदा मंजूर झाल्या पासून 7 दिवसाचे आत एकूण ठेक्याचे रकमेच्या 5 टक्के सुरक्षा ठेव (सिक्युरीटी डिपॉझीट) म्हणून 18 महिने कालावधीकरीता जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन, अकोला जिल्हा अकोला यांचे नावाने 8483- सिव्हील डिपॉझीट, रेव्हेन्यू डिपॉझीट, 102- सिक्यरीटी डिपॉझीट या लेखाशीर्षाखाली शासकीय कोषागारात भरणा करावी लागेल. तसेच त्याच बरोबर वाहतूकीच्या कार्यकृतीची हमी पुर्ण करणे बाबत करारनामा रुपये 100 च्या कोर्ट फी स्टॅप पेपरवर (नियमा नुसार ) लिहून द्यावा लागेल. त्या शिवाय ठेका मंजूर केला जाणार नाही.

24.) ठेकेदाराने ठेका मंजूर झाल्या नंतर नियमाप्रमाणे काम करणे किंवा कार्यभार पार पाडण्याचे नाकारले तर नियम व अटीचा भंग करणे इत्यादी कारणामुळे त्यांचे ठेक्याचे काम बंद करुन त्यांनी भरलेली अमानत रक्कम व सुरक्षा ठेव रक्कम जप्त करण्यात येईल व त्यामुळे इतरास कामाकरीता ठेका मंजूर करताना जास्त दर मंजूर करावे लागले तर पूर्ण ठेक्याचे रकमेतील फरक ठेकेदाराच्या जप्त रकमेतून स्थावर जंगम मालमत्तेतून वसुल करण्यात येईल.

25.) निविदा भरतांना निविदाधारकास नियम व अटी पुर्ण वाचून त्या समजावून घेऊन त्यास मान्य आहे असे समजून त्यावर स्वाक्षरी करावी लागेल. अन्यथा निविदा फेटाळल्या जातील. निविदेसोबत शासकीय अटी शिवाय ठेकेदाराची इतर कोणतीही अट स्वीकारण्यात येणार नाही. व तसा उल्लेख केल्यास निविदा रद्द करण्यात येईल.

26.) संपूर्ण निविदा स्विकारणे मंजूर करणे, रद्द करणे व इतर कोणतेही कारण न दाखवीता मान्य न करणे वगैरे सर्व बाबतीत अधिकार निविदा समितीस राहतील. व निविदा समितीचा निर्णय निविदाधारकास बंधनकारक राहील.

27.) जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन, अकोला जिल्हा अकोला यांना ठेकेदाराचे काम समाधानकारक न आढळल्यास ते बंद करण्याचे, तत्सम दुसरी कार्यवाही करण्याचे अधिकार राहतील. अशावेळी सुरक्षीत ठेव, अमानत रक्कम जमा करुन त्यावर कार्यवाही करण्यात यईल.

28.) वेळोवेळी शासकीय नियमातील शासकीय कार्यालयातील बदलानुसार जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन, अकोला जिल्हा अकोला यांच्या सुचना व अटीचे पालन ठेकेदारास करावे लागेल.

29.) गाडीचा वेग 40 कि.मी. पेक्षा जास्त ठेवता येणार नाही. तसेच मदयपानइत्यादी करुन चालक आढळल्यास व गाडीचा वेग मर्यादेचे उल्लंघन आढळल्यास त्यास रुपये 300/- ते रुपये 1000/- दंड आकारण्यात येईल व मदयपानाबाबत कार्यवाहीस सामोरे जावे लागेल. त्यामुळे शासकीय संपतीचे नुकसान झाल्यास ती ठेकेदारास भरुन द्यावी लागेल.

30.) हेच वाहन पशुसंवर्धन खात्याचे इतर संस्थेच्या योजनाअंतर्गत वाहतूकीसाठी उपलब्ध करुन दयावे लागेल.

Scanned by CamScanner

31.) अपेक्षीत वाहतूक ही अकोला जिल्हया करीता दरमहा 1200 कि.मी. पर्यंत राहील जिल्ह्या बाहेरील वाहतूक ही आवश्यकते प्रमाणे राहील.

32.) जिल्हायाअंतर्गत द्रवनत्रपात्राची वाहतूक करतांना जिल्हयातील प्रत्येक केंद्रावर पशुधन विकास अधिकारी, जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, अकोला यांचे आदेशानुसार ठरवून दिलेल्या मार्गाने वाहतूक करण्याचे बंधन वाहतूक ठेकेदारावर राहील.

33.) जे निविदाधारक दुस-या क्रमांकावर राहतील त्यांची अमानत रक्कम(कॉल डिपॉझीट) एक महिण्याचे आत परत करण्यात येईल व इतराची अनामत रक्कम तावडतोब परत करण्यात येईल.

34.) वाहन हे सुस्थितीत नोंदणीकृत व समितीला मान्य होईल अशा अवस्थेत असावे. समितीला मान्य होइल अशा वाहनाचे बाबतीतच निविदा उघडण्यात येईल.

35.) मोहरबंद निविदा उघडण्याचे वेळी निविदाधारकाने त्याचे वाहन व वाहनाच्या सर्व कागदपत्राच्या मुळ प्रती प्रत्यक्ष तपासणी करीता निविदा समितीस दाखवणे आवश्यक आहे.

36.) भारत सरकार, आयकर विभागाचे नियमाप्रमाणे करारमार्फत प्राप्त होणा-या रकमेवर नियमा प्रमाणे कर दरमहा सरकार भरणा करावा लागेल.

37.) द्रवनत्र वाहतूकीच्या वेळी वाहतूक मार्गात, उपकेंद्राचे ठिकाणी द्रवनत्र भरुन घेण्याचे ठिकाणी घाई न करता सौम्य वागणूकीनेच वाहन चालक व इतर सहकारी राहील याची खबरदारी वाहन ठेकेदारास घ्यावी लागेल.

38.) यासंबंधी उद्भवनारा वाद व तक्रारीचे निवारण करण्याचे अंतीम अधिकार जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन, अकोला जिल्हा , अकोला याना राहतील.

जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन,
अकोला जिल्हा, अकोला

Scanned by CamScanner